माहितीचा
अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : ३८/२०२३**

**तक्रारकर्ता, श्रीमती वंदना मिलींद जिवने,**

**--विरुध्द--**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,**
नगर रचना विभाग, महानगर पालिका, नागपूर

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहायक संचालक,**
नगर रचना विभाग महानगर पालिका, नागपूर

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : २२.११.२०२३**

**तक्रारकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक |
|---|---|---|
| १३.०९.२०२२ | --- | २७.०१.२०२३ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र. ८४/२०२१ मध्ये दिनांक १३.०९.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दिनांक २२.११.२०२३ रोजी ऑनलाईन सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना विभाग, महानगर पालिका, नागपूर ऑनलाईन उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना विभाग, महानगर पालिका, नागपूर ऑनलाईन उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील क्र. ८४/२०२१ मध्ये दिनांक १३.०९.२०२२ रोजी सुनावणी घेवून " अपिलार्थी यांनी त्यांचे व्दितीय अपिलाबरोबर संलग्न केलेल्या मा. महानगरपालिका आयुक्त यांना

दि. २७.०६.२०२२ रोजी सादर केलेल्या निवेदनाची प्रत ही मा. महानगरपालिका आयुक्त यांच्याकडून योग्य त्या प्रशासकीय कारवाईसाठी सादर करण्यात यावी. त्यासंबंधित संस्थेच्या प्रस्तावावर निर्णय घेण्यास लागलेला विलंब यांची गंभीर दखल घेवून त्यात वरील विलंबास जाबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुध्द त्यांना योग्य वाटल्यास प्रशासकीय कारवाई करण्याच्या निर्देशासह" प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात आले आहे.

सदर द्वितीय अपीलावरील आदेशास अनुसरुन तक्रारकर्ता यांनी दिनांक २७.०१.२०२३ रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपिलार्थी, अध्यक्षा, श्री. चरणदास स्वामी सहकारी गृह निर्माण संस्था मर्या. नागपूर यांनी दि. २७.०१.२०२३ रोजी तक्रार अर्ज दाखल केला. सदर तक्रार अर्जात अपिल क्र. ८४/२०२१ मध्ये १३.०९.२०२२ च्या सुनावणीत पारित आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचा आक्षेप नोंदविला आहे. त्यानुषंगाने आयोगाने नगर रचना, महानगरपालिका, नागपूर यांनी अपिलार्थी यांनी संलग्न केलेल्या मा. महानगरपालिका आयुक्त यांना दि. २७.०६.२०२२ रोजी सादर केलेल्या निवेदनाची प्रत ही मा. महानगरपालिका आयुक्त यांच्याकडून योग्य त्या प्रशासकीय कारवाईसाठी सादर करण्यात यावी. त्यासंबंधित संस्थेच्या प्रस्तावावर निर्णय घेण्यास लागलेला विलंब यांची गंभीर दखल घेवून त्यात वरील विलंबास जाबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुध्द त्यांना योग्य वाटल्यास प्रशासकीय कारवाई करण्याचे आदेशित करण्यात आले. परंतु अपिलार्थी यांनी आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार तपशिल सादर न केल्याचा आक्षेप नोंदविला आहे. नगर रचना, महानगरपालिका, नागपूर यांनी संबंधित संस्थेच्या वतीने दि. १५.०५.२०२२ दि. २७.०६.२०२२ या निवेदनावर कुठलीच कार्यवाही केली नसल्याने पारित आदेशाची अवहेलना केली असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थी, श्रीम. वंदना जिवणे यांच्यावतीने श्री. मिलिंद जिवणे आज व्यक्तिश: उपस्थित आहेत. नगर रचना विभाग, महानगर पालिका, नागपूर कार्यालयाच्या वतीने प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. ऋतुराज जाधव व जनमाहिती अधिकारी श्री. आंनद मोखवे ऑनलाईन पद्धतीने उपस्थित आहेत. प्राधिकरणाच्या वतीने व्दितीय अपिल क्र. ८४/२०२१ मध्ये दि. १३.०९.२०२२ रोजी अंतरिम आदेश पारित करण्यात आले. त्यावर दि. २०.०२.२०२३ रोजी अंतिम आदेश झाले असून त्यात सविस्तर स्वंयस्पष्ट आदेश पारित करण्यात आले आहे. दि. १३.०९.२०२२ रोजी जनमाहिती अधिकारी यांच्या वतीने नगर रचना नगर रचना विभाग, महानगर पालिका, नागपूर यांनी व्यक्तिश: उपस्थित राहून प्रदीर्घ लेखी खुलासा सादर केला आहे. वरील खुलासाचे अवलोकन केले असता, या संदर्भातील कायदेशीर बाबीची नोंद करीत दि. २०.०२.२०२३ रोजी झालेल्या सुनावणीत खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात आले आहे.

"उपरोक्त खुलाशात अपिलार्थी यांच्या वतीने सादर करण्यात आलेल्या माहिती अर्जाला विहीत मुदतीत प्रतिसाद देण्यात आलेला असून अपिलार्थी यांची मुख्य मागणी ही इमारत बांधकाम मंजुरीकरीता आवश्यक शुल्काचा भरणा न करता तसेच अग्निशमन विभागाकडील नाहकरत प्रमाणपत्र सादर न करता सदर इमारत बांधकाम नकाशा Deemed to be sanction करुन देण्याबाबतची आहे. याबाबत नगर रचना विभागात असलेल्या संपूर्ण प्रस्तावाची प्रत देखील खुलाशासोबत पाठविण्यात आलेली असून दिनांक १३.०५.२०२२ रोजी जारी करण्यात आलेले पत्र व टिपणी यापूर्वीच अपिलार्थी यांना निर्गमित करण्यात

आलेले आहे. अपिलार्थी यांचा मुख्य आक्षेप Deemed to be sanction याबाबत आहे. यातील UDCPR-२०२० याबाबतीत तरतुद देखील नमूद करण्यात आलेली आहे व ती खालीलप्रमाणे आहे.

"If within sixty (६०) days of receipt of the notice, along with necessary permission fees under the regulations, the Authority fails to intimate in writing to the person, who has given the notice, of its refusal or sanction or sanction with such modifications or directions, the notice with its plan and statements shall be deemed to have been sanctioned, provided nothing shall be construed to authorize any person to do anything on the site of the work in contravention or against the terms of lease or titles of the land.

Provided that, the development proposal, for which the permission was applied, is strictly in conformity with the requirements of these regulations or regulations framed in this behalf under any law for the time being in force and the same in no way violates either provisions of any draft or final Development/Regional Plan/Planning Proposal or proposals published by means of notice, submitted for sanction under the Act. Provided further that any development carried out in pursuance of such deemed permission which is in contravention of the above provisions, shall be deemed to be an unauthorized development for purposes of Section ५२ to ५७ of the Maharashtra Regional and Town Planning Act, १९६६ and other relevant Acts.

Provided further that, upon receipt of intimation of any claim for deemed permission the Authority shall within fifteen days from the date of receipt of such claim, communicate its remarks, if any, regarding deemed permission to the applicant, failing which, the proposal shall be approved and commencement certificate along with one set of duly approved plans for proposed development shall be issued to the applicant within fifteen days thereafter.

Provided further that, necessary explanation shall be called from the concerned officers of the planning Authority for not processing and disposing of the proposal within ६० days and necessary action as per relevant provisions of Act/Rules shall be initiated against the defaulter officer."

वरील तरतुदींचे अवलोकन केले असता, कोणत्याही विकासकाने सादर केलेला प्रस्ताव हा विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुदीनुसार असल्यास नगर रचना विभागाकडून मान्यता मिळण्यास विलंब झाल्यास त्यास मान्यता मिळावी, असा आग्रह धरुन कार्यवाही करणे आवश्यक आहे. मात्र सादर केलेला बांधकाम नकाशा हा जर नियमाअंतर्गत नसल्यास व प्रचलित नियमावलीला छेद देणारा असेल तर अशा कोणत्याही प्रस्तावाला Deemed to be sanction लागू होत नाही, हे स्पष्ट आहे. त्याअनुषंगाने अपिलार्थी यांच्या वतीने सादर केलेला नकाशा हा विकास नियंत्रक व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुदीनुसार नसल्यामुळे व त्रुटीपुर्ण व दोषपूर्ण असल्यामुळे मान्यता देण्यात आलेली नाही. यापूर्वी दिनांक १३.०५.२०२२

रोजी नगर रचना विभागाच्या वतीने जारी पत्रात मागणीपत्रक/चालान याबाबत पुर्तता केल्यास श्री. चरणदास स्वामी सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्यादीत, नागपूर यांना दिनांक १७.०९.२०२१ रोजी इमारतीचा बांधकाम परवाना नुतनीकरण अधीन राहून मंजूर करण्यात आला आहे. तरी सदर रक्कम बँकेत जमा झाल्याची पावती या कार्यालयास सादर करावी अन्यथा दिलेली मंजूरी रद्द समजण्यात येईल, असे कळविले आहे.

यापूर्वी पारीत केलेल्या आदेशात अपिलार्थीस संपूर्ण माहिती देण्याव्यतिरिक्त मा. महानगरपालिका आयुक्त, नागपूर यांना संस्थेच्या वतीने सादर केलेल्या दिनांक २७.०६.२०२२ रोजीच्या निवेदनाची प्रत अग्रेषित करण्यासाठी यापूर्वी सुचीत केलेले होते. सादर केलेल्या कागदपत्रांच्या अवलोकनावरुन मा. आयुक्त, महानगरपालिका नागपूर यांनी यापूर्वी दि.०५.०५.२०२२ रोजी तत्वत: मंजूरी प्रदान करण्यात आलेली होती. त्याअनुषंगाने अर्जदार यांना आवश्यक विविध शुल्काकरीता दि.१३.०५.२०२२ रोजी मागणीपत्रक निर्गमित करण्यात आलेले होते. तसेच सदर प्रस्ताव हा विशेष इमारत प्रस्ताव असल्याने, या करीता अग्निशमन विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र आवश्यक असल्याने उक्त प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच सदर प्रस्तावास अंतिम मंजुरी प्रदान करण्यात येईल या आशयाचे पत्र दि. १३.०५.२०२२ रोजी अर्जदार यांना निर्गमित करण्यात आलेले होते. अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती नगर रचना विभागाच्या अखत्यारीत असलेली माहिती यापूर्वीच अपिलार्थीस प्रदान केलेली असल्यामुळे संबंधित प्रकरण नस्तीबध्द करण्यास हरकत नसल्याचे आढळून येते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) नुसार अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती प्रदान करणे अपेक्षित असून घेतलेल्या निर्णयावर भाष्य करणे, केलेल्या कार्यवाहीवर प्रश्न उपस्थित करणे हे माहितीचा अधिकार कायद्याच्या कार्यकक्षेत येत नाही. त्यामुळे सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती यापूर्वीच अपिलार्थीस प्रदान केलेली असल्यामुळे वरील व्दितीय अपील अंतिमत: नस्तीबध्द करण्यात येत आहे.”

यात याआधीच नोंद केल्याप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ च प्रमाणे घेतलेल्या निर्णयावर भाष्य करणे किंवा प्रश्न उपस्थित करणे, एका विशिष्ठ मुद्यांच्या पद्धतीने आग्रही विनंती करणे याबाबत सुस्पष्ट नमूद केले आहे. अपिलार्थी यांना अभिलेखातील उपलब्ध माहिती जनमाहिती अधिकारी यांनी याआधीच माहिती प्रदान केली असल्याने सदर प्रकरण अंतिमत: नस्तीबद्ध करण्यात आले. अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या तक्रारीत मौखिक युक्तीवादात दि. १३.०९.२०२२ रोजीच्या आदेशाची अमंलबजावणी झाली नसून वरील नस्ती आयुक्ताकडे सादर केली नाही. मौजा- इंदोरा, खसरा क्र.६१/१, शिट क्र.४३, नभूक्र.५२७/४, ५३६/२, लाल गोडावून जवळ, कामठी रोड, नागपूर या जागेच्या बांधकाम मंजूरी मिळण्याबाबत महानगरपालिकाच्या आयुक्तांना विचार करण्यास कुठलीच संधी प्राप्त झाली नसल्याने त्यांच्यावर अन्याय झाला असल्याचे नमूद केले.

याच प्रकरणी सरकारी गृहनिर्माण संस्थेने दाखल केलेल्या कागदपत्रात, मा. उच्च न्यायालयाच्या रिट पिटीशन क्र. १३४२/२०२३ मध्ये दि. ०५.१०.२०२३ रोजी पारित आदेशाची प्रत जोडण्यात आली आहे. वरील आदेश स्वंयस्पष्ट असून महानगरपालिकेच्या वतीने जारी केलेली डीमान्ड नोट विहीत प्रक्रियेनुसार कायदेशीर मार्गाचा अवलंब करून आव्हान देण्याची मुभा देण्यात आली आहे. अपिलार्थी यांचा मूळ माहिती अर्ज, सादर केलेले निवेदन, व्दितीय अपिल सुनावणीत केलेला युक्तीवाद तसेच मा. उच्च न्यायालय यांनी

पारित केलेला आदेश एकाच विषयाशी संबंधित आहे. आयोगाने दि. २०.०२.२०२३ रोजी पारित केलेल्या आदेशात रिट पिटीशन क्र. १३४२/२०२३ यात पारित आदेशाचे अवलोकन केले असता, तक्रार नस्तीबद्ध करण्यात आली. मुळात सदर प्रकरणी दि. १३.०९.२०२२ रोजीचे अंतरिम आदेश दि. २०.०२.२०२३ रोजी अंतिम आदेशात परावर्तीत झाले असून अपिलार्थी यांना माहिती अधिकार अधिनियम, २००५ नुसार कलम २ च प्रमाणे माहिती प्रदान केली असून अपिलार्थी यांच्या मूळ तक्रारीवर मा. उच्च न्यायालयाने निर्णय पारित केले असून त्यावर कुठलेही भाष्य करणे योग्य नाही. त्यानुषंगाने सदर तक्रार अर्ज अंतिमत: नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग *नागपूर*

(राहुल भा. पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

**ठिकाण :** नागपूर
**दिनांक :** २२.११.२०२३

**जा.क्र.**1578**दि.** 14 MAR 2024